मुंबईकरांचा प्रवास आणखीन वेगवान, सुखकर होणार

# सीप्झ ते कुलाबा मेट्रोला डिसेंबर २०२३चा मुहूर्त

**मुंबई :** प्रखर उन्हात घामाच्या धारांसह लोकलच्या प्रवासातून आता मुंबईकरांची काहीशी सुटका होणार आहे. कारण सीप्झ ते कुलाबा दरम्यान डिसेंबर २०२३ पर्यंत मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे. या मार्गावरील २६ स्टेशनपैकी २१ स्थानकांचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, १८ स्थानकांवर इतर उपकरण लावण्याचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने दिली आहे. त्यामुळे आता मुंबईकरांचा प्रवास आणखी वेगवान आणि सुखकर होणार आहे.

एकाचवेळी अनेक विभागांचे काम पूर्ण झाले आहे. मेट्रो स्थानकाच्या बांधकामासह इतर उपकरणे लावण्याचे काम वेगाने सुरू आहे. १८ स्थानकांत उपकरणे लावण्याचे



काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. विधानभवन स्टेशनचे काम ९३ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे, तर एमआयडीसी स्थानकाचे काम ९६ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे. मार्च २०२१पासून या मार्गावर रूळ बसवण्याचे काम सुरू आहे. आत्तापर्यंत हे काम ५६ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे. एमएमआरसीने आरेतील कारशेड लवकरात लवकर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवलं आहे. कारशेडचं काम आत्तापर्यंत ५३.८ टक्के पूर्ण झालं आहे. या वर्षात कारशेडचं काम पूर्ण होऊ शकत नसल्याने एमएमआरसीएलने सीप्झ ते बीकेसीपर्यंत ९ रेकसह मेट्रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

३३.५ किमी लांबीच्या मार्गिकावर अप आणि डाऊन मार्ग मिळून ६६.०७ किमी ट्रॅक बसवण्यात येणार आहे. या पूर्ण मार्गावर १०७४५ मॅट्रिक टन ट्रॅकचा वापर होणार आहे. निर्धारित वेळेत मेट्रो सेवा सुरू करण्यासाठी एमएमआरसीने पहिल्या टप्प्यात मेट्रो मार्गिका आणि स्टेशन निर्मितीसह उपकरणाचे काम ८५.२ टक्के काम पूर्ण केल्याची माहिती दिली आहे.

## मेट्रो चाचणी यशस्वी

सीप्झ ते वांद्रे यादरम्यान नऊ स्थानके एप्रिल २०२३ पर्यंत पूर्णपणे तयार होतील. मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील मार्गिकांवर आतापर्यंत मेट्रो चाचणी यशस्वी झाली आहे. यादरम्यान १० किमीपर्यंत मेट्रो धावली असून, सर्व सुरक्षा तपासण्यात आली आहे. मेट्रो प्रवासी वाहतुकीसाठी सक्षम आहे का? याबाबत पडताळणी करण्यात आली. त्याशिवाय, मध्यम आणि हाय व्होल्टेजवर मेट्रोची चाचणी करण्यात आली. तसेच मेट्रोच्या ब्रेकची क्षमता, एअर कम्प्रेसर, स्वयंचलित दरवाजांची कार्यक्षमता, वायुविजन याचीही चाचणी झाली.